# रविराया आणि चंदाराणी

वर्षा दास

अनुवाद : सुषमा सोनक

चित्रे : जगदीश जोशी



नेहरू बाल पुस्तकालय

# रविराया आणि चंदाराणी

**वर्षा दास**

अनुवाद

**सुषमा सोनक**

चित्रे

**जगदीश जोशी**

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



कोणे एके काळी
दिवसोबा नावाचा एक माणूस होता.
त्याची बायको रातमाय. ती खूप सुंदर होती.
त्यांना चंदाराणी नावाची एक हसरी लेक
अन् रविराया नावाचा मुलगा होता.
सारे मिळून आनंदात राहत होते.






एके दिवशी मुले लांबवर फिरायला गेली.
चहूकडे सुरेख फुले फुलली होती.
रंगीबेरंगी फुलपाखरे उडत होती.
पाखरे चिवचिवत होती.
दोघे हसत खेळत जात होते.
अचानक काय झाले! ते जंगलात वाट चुकले.
आता काय करायचे बरे?









जंगलात एक भयंकर अजगर राहत होता.
फार दिवसांपासून तो उपाशी होता.
मुलांना पाहून तर भूक अधिकच कडाडली.





अजगर रविराया आणि चंदाराणीकडे सरपटत निघाला. दोघांनाही गपकन् गिळून टाकले. पोटपूजा तर छान झाली. मग तो नदीकाठी आराम करायला गेला.






इकडे दिवसोबा आणि रातमाय काळजीत पडले.
मुलांना सगळीकडे शोधू लागले.
शोधता शोधता थकले. एका झाडाखाली बसले.
झाडावर दोन कावळे बसले होते.
त्यांनी अजगराला मुलांना गिळतांना बघितले होते.
"तुमची मुले अजगराच्या पोटात आहेत," ते बोल

दिवसोबा आणि रातमायला धसकाच बसला.
रातमाय बहिणीकडे मदत मागायला गेली.
बहिणीचे नाव नीजमाय.
नीजमायला एक नामी उपाय सूचला.
"मी अजगराला झोपवीन. मग तू रविराया
आणि चंदाराणीला बाहेर काढ," तिने रातमायला सांगितले.
नंतर ते जंगलात गेले.
नीज हळूच अजगराच्या डोळ्यात शिरली.
अजगराने एक मोऽठी जांभई दिली
आणि आपले तोंड उघडेच टाकून तो झोपी गेला.



रातमाय अजगराच्या पाठीवर चढली.
तिने मुलांना बाहेर काढले.
मग ते सगळे तिथून धूम पळत सुटले.
नीजमायने पण बाहेर उडी घेतली
आणि तीही नाहीशी झाली.





अजगर जागा झाला.
त्याने मुलांना पळून जातांना बघितले.
खूप खूप पाठलाग केला.
पण रविराया आणि चंदाराणी
एका उंच पहाडावर चढले
आणि आकाशात उडून गेले.



अजगर रागाने काळानिळा झाला.
खूप जोराने फुत्कारला.
हे बघून रविराया आणि चंदाराणी
मग आकाशातच राहू लागलेत. आता अजगर
दोघांनाही गिळू शकत नाही.

रविराया वडिलांच्या देखरेखीत
दिवसाच निघतो आणि
चंदाराणी रातमायच्या कुशीत दिसते.



आकाशात रविराया आणि चंदाराणी
कधी दिसले की अजगर जोराने
फुत्कारू लागतो. अशा वेळी आपण
वारा सुसाट वाहतांना ऐकतो.

रु. 14.00 ISBN 81-3910-9
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

